खटला दाखल तारीख : १६.०८.२०००.
खटला नोंदणी तारीख : १६.०८.२०००.
निकालाची तारीख : १९ .०१.२०१६.
कालावधी: १५वर्ष—०५महिने—०३दिवस.
निशानी क्रमांक : ७०.

**घोडनदी (शिरुर) येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, घोडनदी (शिरुर) यांचे न्यायालयात (पीठासीन अधिकारी — सो.द.घनवट यांचे समोर)**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ५८/२०१६**
**(जुना संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४९७/२०००.)**

महाराष्ट्र सरकार
पोलिस ठाणे अंमलदार,
शिरुर पोलिस स्टेशन, — **अभियोगपक्ष.**
यांचे मार्फत —
(ज्ञानेश्वर कारभारी बढे याचे फिर्यादीवरून).

**—विरूध्द—**

०१. वसंत बबन कारकुड,
वय—३५ वर्षे, धंदा—मजुरी,

— **आरोपी.**

०२. नवनाथ ज्ञानोबा दरेकर,
वय—२४ वर्षे, धंदा—चालक,

०३. बाळू बबन कारकुड,
वय—२५ वर्षे, धंदा—मजूरी,
वरील सर्व रा. सणसवाडी,
ता. शिरुर, जि. पुणे.

०४. बंडू लक्ष्मण माळी,
वय—४० वर्षे, धंदा—मजूरी,
रा. कोरेगांव भिमा,
ता. शिरुर, जि. पुणे.

**(आरोपी क. ३ व ४ यांची संपरीक्षा स्वतंत्र घेण्यात येईल.)**

**गुन्हा — भा.दं.वि.कलम—३७९ सह कलम ३४ अन्वये.**

१. अभियोगपक्षातर्फे वकील — श्री. आर.आर. त्रिमुखे.

२. आरोपींतर्फे वकील — श्री. पी.टी. शिंदे.

# न्यायनिर्णय

(आज ता. १९, माहे जानेवारी, २०१६ रोजी पारीत केला.)

आरोपींनी संगनमताने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची चालू इलेक्ट्रीक लाईनचे आठ गाळयातील ॲल्युमिनिअम तारा ६४०० फूट तोडून अंदाजे किंमत रु. ३२,५६२/— ची शासनाच्या संमतीविना अप्रामाणिकपणे स्थानभ्रष्ट करून चोरी केली म्हणून त्यांचेविरूध्द भा.दं.वि. कलम—३७९ सह कलम—३४ अन्वये सदरचा खटला सुरू आहे.

## अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे.

०२. फिर्यादी हा म.रा.वि.मं. न्हावरा सेक्शन येथे कार्यरत असून ता. ०५/०७/२००० रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास ते त्यांचे न्हावरा येथील कार्यालयात असताना कर्डे गावचे वायरमन हरगुडे यांनी येवून सांगितले की, कर्डे गावचे बांदल वस्ती, न्हावरा रोड येथील चालू लाईनच्या पोलवरुन ॲल्युमिनिअम तारा एकूण आठ गाळ्यातील चोरीला गेल्या आहेत. त्यानंतर फिर्यादीने घटनास्थळाला भेट दिली व त्याने पाहिले की, आठ गाळ्यातील इलेक्ट्रीकच्या ॲल्युमिनिअमच्या तारा अंदाजे ६४०० फूट लांबीच्या व रु. ३२,५६२/— च्या चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्याने सदरचे घटनेबाबत ता. ०५/०७/२००० रोजी पोलीस स्टेशन, शिरुर येथे रिपोर्ट दिला.

०३. सदरच्या रिपोर्टवरून शिरुर पोलिस

स्टेशनला गुन्हा रजिष्टर क्र. ९७/२००० हा भा.दं.वि.कलम—३७९ अन्वये दाखल करण्यात आला व तपासाकामी तो ए.एस.आय. श्री. एस.ए. दळवी यांच्याकडे सोपविण्यात आला. सदरच्या गुन्हयाच्या तपासाकामी त्यांनी ता. ०६/०७/२००० रोजी घटनास्थळाला भेट दिली व दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. तसेच त्यानंतर त्यांनी आरोपी क्र. १ ला अटक केली. तो त्यांच्या ताब्यात असतांना ता. ०२/०८/२००० रोजी त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांनी त्याचा कबुली जबाब दोन पंचासमक्ष नोंदविला. त्याने त्याचे जबाबात सांगितले की, त्याने व इतर आरोपींनी चोरुन नेलेली तार त्याने वाघाळे गावचे कारकुड वस्तीत त्याचे घरासमोरील छपरात बाजरीच्या सरमडाखाली लपवून ठेवली आहे व ती तार तो काढून देण्यास तयार आहे. त्याप्रमाणे ते व दोन पंच व आरोपी क्र. १ तेथे गेले व आरोपी क्र. १ याने त्याचे घरासमोरील छपराजवळील बाजरीचे सरमडाखाली लपवून ठेवलेली व चोरुन आणलेली तार अंदाजे ५४८ फूट गोलाकार बांधलेली व सरळ वेढयात बांधलेले ॲल्युमिनिअमच्या तारेचे वीस तुकडे एकूण ३६ फूट लांब असलेले अशी अंदाजे रु. ५,०००/— ची ॲल्युमिनिअमची तार काढून दिली. त्यांनी त्याबाबत जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर त्यांनी इतर आरोपींना अटक केली. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी सदरच्या गुन्हयाचा तपास पूर्ण करून आरोपींविरूध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदरचे खटल्यातील आरोपी क्र. ३ व ४ हे मिळून येत नसल्यामुळे सदरचा खटला त्यांच्यापासून स्वतंत्र चालविण्याचा आदेश माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी ता. ११/०३/२०१५ रोजी केलेला आहे.

०४. माझे विव्दान पुर्वाधिकारी यांनी आरोपी क्र. १ व २ विरूध्द भा.दं.वि.कलम—३७९ सह कलम—३४ अन्वये आरोप निश्चित (नि.५७) केले. आरोपातील मजकूर आरोपींना सविस्तरपणे वाचून मातृभाषेत समजाविण्यात आला. आरोपींनी आरोप अमान्य करून प्रकरणाची

पुढील सुनावणी करण्याची मागणी केली.

०५. आरोपींविरूध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे खालील साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत.

१. दादाभाऊ वामन मारणे (अ.सा.१)—नि.६२—साक्षीदार.

०६. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपींविरूध्द पुरावा उपलब्ध नसल्याने आरोपींचे फौ.प्र.सं.कलम—३१३ प्रमाणेचे जबाब नोंदविण्यात आले नाहीत.

०७. या प्रकरणातील अभियोगपक्षाचे कथन व अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आहेत व त्या मुद्दयांवर मी खालील दिलेल्या कारणासाठी माझे निष्कर्ष खाली नोंदवित आहे.

| **अ.क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१) | आरोपी क्र. १ व २ यांनी इतर आरोपींसोबत संगनमताने ता. ०४/०७/२००० रोजी २२.०० वाजेच्या सुमारास मौजा—कर्डे येथे म.रा.वि. मंडळाची चालू इलेक्ट्रीक लाईनची आठ गाळ्यातील ६४०० फूट ॲल्युमिनिअमची तार अंदाजे किंमत रु. ३२,५६२/— ची तोडून शासनाचे संमतीशिवाय अप्रामाणिकपणे स्थानभ्रष्ट करून चोरी केली, हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय? .... | नाही. |

०२) आदेश काय ? ... आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रं. १ बाबत :—

०८. सदरच्या खटल्यामध्ये अभियोगपक्षाने श्री. मारणे (अ.सा.१) याला तपासल्यानंतर असे लक्षात आले की, त्याने आरोपींविरूध्द कोणताही शब्द उच्चारलेला नाही. तो आरोपींना फितुर झाल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा उलट तपास घेतला. परंतु त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही. सदरच्या साक्षीदाराने आरोपींविरूध्द एकही शब्द उच्चारलेला नाही. तसेच कोणत्याही साक्षीदाराने आरोपींना चोरी करतांना पाहिले असल्याचे सांगितले नाही. तसेच सदरचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला हे अभियोगपक्षाच्या कोणत्याही साक्षीदाराने सांगीतले नाही. त्यामुळे अभियोगपक्षास सदरचा खटला आरोपींविरूध्द शाबीत करता आला नाही. यावरून असे स्पष्ट होते की, आरोपींचा गुन्हा सिध्द होण्यासाठी काहीही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांच्या आधारावर मी या निष्कर्षास आलेलो आहे की, आरोपींच्या विरूध्द भा.दं.वि.कलम—३७९ सह कलम ३४ च्या घटकांची पुर्तता होत नाही. सबब मी मुद्दा क्रं. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

### मुद्दा क्रं. २ बाबत —

०९. आरोपींविरूध्द काहीही पुरावा न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम—३१३ अन्वयेचे जबाब नोंदविण्यात आले नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपींचा गुन्हा शाबीत करण्यासाठी पुरेसा विश्वसनिय व संयुक्तिक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये

आणलेला नाही. त्यामुळे मी आरोपींना दोषी धरत नाही. त्यामुळे त्यांची निर्दोष मुक्तता होण्यास ते पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्रं. २ चे उत्तरासाठी मी पुढील अंतीम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम—२४८(१)प्रमाणे आरोपींना या खटल्यातील भारतीय दंड विधान कलम—३७९ सह कलम—३४ या गुन्हयामधुन दोषमुक्त करण्यात आलेले आहे.

२. आरोपींच्या जामीनकीचे बंधपत्र याव्दारे रद्द करण्यात आलेले आहेत.

३. आरोपींनी अपीलात हजर राहण्यासाठी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/—चा वैयक्तिक जातमुचलका व तेवढयाच रक्कमेचे जामीनकीचे बंधपत्र दयावे.

४. आरोपी क्र. ३ व ४ संपरीक्षेसाठी सदरचा खटला प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

( सो. द. घनवट )

दिनांक :— १९/०१/२०१६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
घोडनदी (शिरुर)

# : शेरा :

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : एस.के. तोरणे
कोर्टाचे नाव : एस.डी. घनवट., न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, शिरूर
निकालाची तारीख : १९/०१/२०१६
निकालपत्र सही केल्याची तारीख : १९/०१/२०१६
निकालपत्र अपलोड केल्याची तारीख : १९/०१/२०१६